आंतरजिल्हा बदलीने पदस्थापना देणे बाबत

----------------------------------------

संग्राम महादेव राळेभात, विस्तार अधिकारी
(कृषि) जिल्हा परिषद जळगांव

जिल्हा परिषद अहिल्यानगर
कृषि विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.जिपअ/कृषि/आस्था २/१८४/२०२५
अहिल्यानगर दिनांक०७/०४/२०२५

वाचा:- १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ व नियम ६ (८)
२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.जिपब ७११/प्र.क्र.११३/११/आस्था १४ दि.२९ सप्टेंबर २०११
३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शुध्दीपत्रक क्र.न्यायप्र- ०५१२/प्र.क्र.११८/१२/आस्था १४ दि.१८/१०/२०१२
४. मा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगांव यांचेकडील पत्र क्र.कृषि /आस्था१/आरआर / ९४ /२०२५ दि.१३/०२/२०२५

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चे नियम ६ (८) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद कर्मचा-यांना एका जिल्हा परिषदेमधुन दुस-या जिल्हा परिषदेमध्ये आंतर जिल्हा बदलीने सामावून घेण्यास सबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम आहेत.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्र २ वरिल परिपत्रकानुसार जिल्हा परिषद कर्मचा-यास आंतरजिल्हा बदलीने सामावून घेण्याबाबतची मार्गदर्शक तत्वानुसार श्री संग्राम महादेव राळेभात, विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती चाळीसगांव ता.चाळीसगांव जिल्हा जळगांव यांना जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत पंचायत समिती ----कर्जत---------- येथे खालिल अटी व शर्तीच्या अधिन राहून एकतर्फी पदस्थापना देणेत येत आहे.

अटी व शर्ती

१. अहिल्यानगर जिल्हा परिषदेकडे सेवेत असलेल्या विस्तार अधिकारी (कृषि) यांचे जेष्ठता यादीत श्री राळेभात यांची सेवाजेष्ठता ते ज्या तारखेपासुन जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे सेवेत हजर होतील त्या तारखेपासून कनिष्ठतम धरणेत येईल
२. श्री राळेभात यांचा सरळसेवेने निवडीचा प्रवर्ग हा खुला (सर्वसाधारण) असा राहिल.
३. सध्या कार्यरत जिल्हा परिषदेमध्ये श्री राळेभात यांना जो वेतनबँड लागू आहे, त्याच वेतनबँडमध्ये जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत त्यांना सामावून घेण्यात येत आहे.
४. नेमणूकीबाबत व सेवाशर्तीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश श्री राळेभात यांना बंधनकारक राहतील.
५. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव व गट विकास अधिकारी पंचायत समिती चाळीसगांव यांनी कळविलेनुसार श्री राळेभात यांचेकडे कोणत्याही प्रकरणी येणेबाकी नसल्याचा दाखला इकडेस सादर केला आहे. तरीही श्री राळेभात यांचेकडे जळगांव जिल्हा परिषदेची कोणत्याही प्रकारची वसुली निघाल्यास त्याची जबाबदारी जिल्हा परिषद अहिल्यानगरची असणार नाही.

६. श्री राळेभात यांची विनंतीवरुन आंतरजिल्हा बदली झाली असल्याने त्यांना जिल्हा परिषद जळगांव अंतर्गत नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी बदली प्रवासभत्ता /पदग्रहण अवधी अनुज्ञेय असणार नाही.

७. श्री राळेभात यांना शासनाने जिल्हा परिषद आंतर जिल्हा बदलीसाठी ठरवुन दिलेल्या संपुर्ण अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

८. श्री राळेभात यांचा जिल्हा परिषद जळगांव यांचकडे भविष्य निर्वाह निधीची रक्कम/अंशदान निवृत्ती योजने अंतर्गत असणारे खाते हे त्यांना जिल्हा परिषद अहिल्यानगरकडे वर्ग करुन घ्यावे लागेल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हां परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.202504010900008 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-04-2025 15:07:20
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री संग्राम महादेव राळेभात, विस्तार अधिकारी (कृषि)
व्दारा, गट विकास अधिकारी पंचायत समिती चाळीसगांव जिल्हा जळगांव

प्रत:-
१. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद जळगांव
२.मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर/जळगांव
३. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
४. गट विकास अधिकारी पंचायत समिती चाळीसगांव जिल्हा जळगांव
५. गट विकास अधिकारी पंचायत समिती ------------------------------------ कर्जत
६. निवड नस्ती